*शोधपत्र- वाणिज्य*

March, 2010

# आपत्ती व्यवस्थापन: विध्वंसातून विजयाकडे

* प्रा. सुरेश आर. वराडे

*वाणिज्य विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोदवड, जळगांव

जे आपत्तीच्या खाईत लोटले गेलेले आहेत तेच आणि केवळ तेच मदतीचे मोल जाणू शकतात. मदतीमुळेच ते सुरक्षित राहू शकतात.

*''एतदयोनीनि भूतानि सर्वाणी त्युपधारय।*
*अहं कृत्स्नस्य जगतः प्रभव : प्रलयस्तथा।।*

हे अर्जून। तु ऐसा समझ कि संपूर्ण भुत इन दोनो प्रकृतियो से ही उत्पन्न होनेवाले है और मै सम्पूर्ण जगत का प्रभाव तथा प्रलय हूँ, अर्थात संम्पूर्ण जगत का मुल-कारण हुँ। कोट्यावधी वर्षापुर्वी आपली पृथ्वी म्हणजे तप्त वायू आणि धुळ यांचा प्रचंड गोळा होता. पुढील कालावधीत तयत विविध भौतिक बदल होत गेले. प्रत्येक बदल घेताना अकालीत अशा घडामोडीचे उद्रेक होत गेले. अठरा कोटी वर्षापूर्वी पृथ्वीवर एक प्रचंड भूभाग होता, 'पॅन्गी' नावाने तो ओळखला जात असे बारा कोटी वर्षापुर्वी काही अतर्क्य कारणांमुळे तो दुभंगला व त्यातून उत्तर गोलार्धात 'लॉरेसिया' तर दक्षिण गोलार्धात 'गोंडवाना ' असे दोन खंड निर्माण झाले. हे इथेच थांबले नाही तर सहा कोटी वर्षापूर्वी गोंडवानाचे तुकडे होवून त्यातून ऑस्ट्रेलिया आफ्रिका, दक्षिण, अमेरिका व अंटार्क्टिका अशी खंडे आणि हिंदुस्थान उपखंड बनले. हिंन्दुस्थानचे उपखंड उत्तर गोलार्धात सरकले. लॉरेसियाचेही तुकडे होऊन त्यातून उत्तर अमेरिका व युरोप ही खंडे निर्माण झाली. हिंदुस्थानचा जो भाग लॉरेजियाला थडकला. त्यायोगे हिमालय पर्वतरांगा अस्तित्वात आल्या. त्या काळात असणाऱ्या जीवसृष्टीला पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू, इत्यादींना या सर्व आपत्तींना सामोरे जावे लागले असणारच त्यांच्या त्याबाबत कोणत्या प्रतिक्रिया झाल्या व या संकटांना त्यांनी कसे तोंड दिले असेल याबाबत काहीच कल्पना करता येत नाही.त्या काळातही भुकंप, ज्वालामुखी, झंझावत, महापूर, भूस्खलन यांसारख्या आपत्ती आल्या असणारच, तसेच वृक्ष मुळापासून उखडले गेले असणार आणि जंगलात वणवेसुध्दा पेटले असणारच दगड -मातीच्या ढिगाऱ्याखाली कैक प्राणी गाडले गेले असणार। काय ते घडले नेमके सांगता येणार नाही. आजवर आपल्याला प्राचीन काळातील मानवी संस्कृतीविषयी थोडीफार माहिती घेणे शक्य झालेले आहे. पाण्यात बुडालेल्या पुरातन व्दारका नगरीचे अवशेष, पृथ्वीच्या पोटात गाडली गेलेली ग्रीक, बॅबिलोनियन किंवा भारतातील सिंधुसंस्कृती याविषयीची माहिती उत्खनन, संशोधन यादृवारे मिळू शकते. परंतु त्या आधीच्या काळातील मेसापोटेनियम संस्कृती का लोप पावली, याबाबत काहीच ठोस माहिती सापडत नाही. मानवाच्या संदर्भात जर ही अशी परिस्थिती आहे तर मानवापूर्वी होऊन गेलेल्या प्राण्यांच्या बाबतीत नोंदी कशा उपलब्ध होणार ? पुरावे कोठुन मिळणार ? या अशा नैसर्गिक आपत्ती मध्ये प्रचंड संहार झाला. प्रदेश भूगर्भात गाडले गेले. तथापि यावरून एक निष्कर्ष मात्र मिळतो. ही संकटे अटळ होती, सर्वसंहारक होती मात्र त्यातूनही जीवसृष्टीची उत्क्रांती झाली. प्रगत होत गेली. आपत्ती या सर्वच प्राण्यांच्या पाचवीला पूजलेल्या आहेत व त्या न संपणाऱ्या आहेत. त्यातून मार्ग काढण्यासाठी प्रत्येक प्राण्याला धडपड ही करावी लागतेच. त्यातूनच प्राणीसृष्टीची उत्क्रांती, विशेषतः मानवप्राण्याची प्रगती होत गेल्याचे आपल्याला आढळून येते.

अशा या प्रचंड आपत्ती पूर्वीपासूनच घडत आहेत. आणि भविष्यातही घडत राहणारच मात्र ज्यावेळेला त्यांच्यामुळे पर्यावरण व मानवी जीवनाला धोका निर्माण होतो, त्याचवेळी केवळ त्यांच्या भयानकतेची जाणीव होते. संयुक्त राष्ट्रसंघाने आपत्ती म्हणजे अशी घटना की ज्यामुळे अगदी आकस्मिकपणे प्रचंड जीवितहानी व अन्य प्रकारची हानी संभवते. 'अशी आपत्तीची व्याख्या केलेली आहे. यातील 'आकस्मिकपणे आणि 'प्रचंड' हे शब्द महत्वाचे आहे. आपत्ती ही आकस्मिपणे ओढवते. तिचा आधी अंदाज येऊ शकत नाही. त्यामुळे त्याबाबत सावधगिरी बाळगता येत नाही. 'प्रचंड' या शब्दाने नुकसानीची व्याप्ती स्पष्ट होते. याचाच अर्थ हे नुकसान पूर्णपणे भरून येऊ शकत नाही. त्यामुळे त्याबाबत सावधगिरी बाळगता येत नाही. किंवा ते किरकोळ लोकांपुरते मर्यादित राहात नाही. तसेच त्यातून वाचलेल्या लोकांना आपल्या आयुष्याची नव्यानेच आणि वेगळ्या प्रकारे सुरुवात करावी लागते. आपत्ती ही विस्तृत अशा भौगोलिक क्षेत्रात ओढावते. लक्षावधी जनतेला तिची झळ पोहोचते. त्यासर्व परिसरातल्या मालमत्तेचे प्रचंड नुकसान होते व त्या घटनेचे समाजावर दिर्घकालीन परिणाम होतात. हे परिणाम आर्थिक, सामाजिक, साकलिक, राजकीय, कायदा आणि प्रशासन अशा सर्वच क्षेत्राच होतात हा झाला संपूर्ण देशाच्या मानवी वंशाच्या समाजांच्या पातळी वरील विचार, त्याला 'समग्रलक्षी 'किंवा' 'सांकृतिक पातळीवर दृष्टीकोन असे संबोधले जाते. या बरोबर या आपत्तीचा अंशलक्षी किंवा 'आशिक ' पातळीवरही विचार करावा लागतो. कारण सर्वावरील संकट हे माझ्यावरील माझ्या कुटूंबावरील माझ्या गल्लीत राहणाऱ्या लोकांवरील, माझ्या गावात राहणाऱ्या लोकांवरील संकट, असतेच आणि म्हणूनच आपत्तीचे निवारण करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील जसे प्रयत्न करावे लागतात. तसेच स्थानिक पातळीवरही प्रयत्न करणे आवश्यक असते. याच गोष्टीकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. स्थानिक पातळीवरील लोकांवर

आलेल्या आपत्तीचे इतर भागातल्या लोकांना कोणतेही सोयसुतक नसते. जेव्हा ती सर्वच भागातल्या जनतेवर ओढवते. तेव्हाच तिची तीव्रता साऱ्यांना जाणवते. या आपत्तीची तीव्रता आणि व्याप्ती यांना अनुसरून 'एल० ते एल ३' अशा वेगवेगळ्या पातळ्या करण्यात आलेल्या आहेत.मानव आणि निसर्ग यातील संघर्ष अनादी काळापासून चालू आहे. निसर्गावर मात करण्यासाठी मानव सतत धडपडत असून त्यासाठी विज्ञानाची कास धरून नवीन शोधन लावण्याचा व नैसर्गिक आपत्तींपासून आपला बचाव करण्याचा प्रयत्न पुर्वापार केला जात आहे. कोणतीही पूर्वसूचना न मिळवता अचानक उद्भवणारी व्यापक दुर्देवी घटना म्हणजे आपत्ती म्हणता येईल अशा आपत्ती अतिवृष्टी, महापूर, वादळ भुकंप असेल किंवा दहशतवादाच्या उद्देशाने केलेला बॉम्बस्फोट असेल. अशा आपत्तीमुळे जीवीतहानीबरोबर वित्तीय हानी होत असल्याने समाज व्यवस्थेबरोबरच शासन व्यवस्था हतबल झाल्याचे दिसून येते. शासनाच्या आर्थिक नियोजनावर अशा आपत्तीने दिर्घकालीन परिणाम होत असल्याने समस्या निर्माण होतात. आपद्ग्रस्तांना त्वरेने वैद्यकीय मदत, अन्न, वस्त्र, निवारा, पेयजल व आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याबरोबर त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडवण्याची जबाबदारी शासन व्यवस्थेची असते. अशी आपत्ती अधिक गंभीर असेल तर जागतिक मदतीचीही आवश्यकता असते ही जागतीक मदत लगेच न मिळाल्यास राज्यशासनाला याबद्दल पावले उचलाविच लागतात. तरी अशा परिस्थितीत आपत्तीत कमीत कमी नुकसान व्हावे म्हणून त्याआधीच खबरदारी घेण्यासाठी आपत्तीपूर्व व्यवस्थापनाची संकल्पना अस्तित्वात आली.

**※'आपत्ती ' म्हणजे काय ?**

**व्याख्या** : (Meaning) अचानक आलेले अरिष्ट किंवा संकट, आपत्ती किंवा अपघात, (महापूर, भुकंप, ज्वालामुखी उद्रेक, आग, वादळ, वारा, विद्युत कोसळणे, बाम्बस्फोट, युध्द, रोगराई, वायुगळती, अवकर्ष, जलप्रलय इ.) म्हणजे ''आपत्ती '' होय. आपत्ती ही पर्यावरणीय विनाशकारी घटना आहे. साहाजिकच जीवीतहानी, वित्तहानी त्यामुळे घडत असते. आपत्ती ही ''नैसर्गिक स्वरूपाची'' किंवा मानवी स्वरूपाची असू शकते. आपत्तीचे स्थान वातावरण किंवा मृदावरण किंवा जलावरण असु शकते. भू-विज्ञानाचा अतिशय जवळचा संबंध आपत्तीच्या घटनांशी येतो. भू-विज्ञानाशीच मानवी जीवन निगडीत असते. त्यामुळे आपत्तीकारक घटना थांबविणे किंवा त्या आपत्तीचे नियंत्रण, व्यवस्थापन करणे जरुरीचे आहे.






**नैसर्गीक आपत्ती कोसळलेली दरड : भयंकर विनाश**

संरक्षण व सामरीक विज्ञानांच्या बदलत्या स्वरूपानुसार त्याच्या आपत्तीचे व्यवस्थापन आवश्यक असते. त्या आपत्ती व्यवस्थापनामध्येच मानवी हीत दडलेले असते. व्यवस्थापनामध्ये नैसर्गिक आपत्ती पासून निर्माण झालेले नुकसान भरुन काढणे, तात्काळ शक्य होऊ शकत नाही. मानवी आपत्तीचे व्यवस्थापन मात्र तात्काळ करता येणे शक्य असते. व्यवस्थापनामध्ये आपत्ती विषयी सूचना माहिती मिळाली तर जीवीतहानी कमी होऊ शकते. आपली विषयक परिस्थितीवर नियंत्रण करणे, धोकेदायक परिस्थिती निवळणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय.

**※आपत्तीचे प्रकार** : (Types of Disaster)

आपत्तींना नैसर्गिक व मानवनिर्मीत अशा दोन ढोबळ प्रकारात विभागण्याची प्रथा आहे. पण त्याची विभागणी खालील ४ प्रकारात सुध्दा करता येते :-

अ) भौगोलिक आपत्ती ब) पर्यावरणीय आपत्ती क) निष्काळजीपणामुळे उद्भवणारी आपत्ती ड) अतिरेकी व कलहामुळे घडणारी आपत्ती नैसर्गिक आपत्ती या खालील प्रकारच्या आहेत. यथावकाश आपण त्यांचा सविस्तरपणे विचार करू.भुकंप, पुर, वादळे, त्सुनामी, दरडी कोसळणे, भुस्खलन अतिवृष्टी, हिमवादळे व हिमपात, मानवी अविचार उतावळेपणा यातून ओढावलेली नैसर्गिक आपत्ती, नैसर्गीक रोगराई, साथीचे आजार, जंगलातील वणवे, ज्वालामुखीचा




उद्रेक, उल्कापात, प्रदेश ओसाळ होणे. भुस्स्कलन, भुकंप, इमारती कोसळणे अशा विविध आपत्तीमध्ये अडकलेल्या अनेकांची सुटका होण्यामध्ये त्यांच्या नशिबाचा जसा भाग आहे. प्रपेक्षा महत्वाचा भाग स्वयंसेवकांनी केलेल्या प्रचंड पराक्रमांचा आहे. सर्वसामान्य व्यक्ती फक्त आपदग्रस्तांना सुटकेसाठी जाते परंतु हे हिशोब प्रशिक्षण घेतलेल्या स्वयंसेवक अपवाद ग्रस्तांना मृत्युच्या अक्राळ विक्राळ टाढेतून अक्षरशः खेचुन बाहेर काढून त्यांना जीवदान देतात. पुर्वी पाहिल्याप्रमाणे आपत्तीची पुर्वसुचना देणारी यंत्रणा जितकी प्रभावी असते. आपत्ती निवारण्यासाठी जितकी चांगल्या प्रकारे पुर्वतयारी केली जाते. तितके आपत्तीमुळे होणारे नुकसान व जीवीतहाणी ही कमी होते. आपदग्रस्तांची संख्या कमी असते. त्यांच्या सुटकेसाठी तुलनेने खुपच कमी प्रयत्न करावे लागतात आणि म्हणूनच आपली व्यवस्थापनात योग्य शिक्षण साधनसामुग्रीची जुळवाजुळव, विवारण्याची पध्दतशिर योजना बनवून तिची तात्काळ अंमलबजावणी करणे या सर्व घटकांचा समावेश होतो.

**नैसर्गिक आपत्ती आणि मानव निर्मिती आपत्ती** :–यामध्ये अनेक प्रकारे अरिष्ठ ओढवू शकते. नैसर्गिक आपत्तीचे संपूर्णपणे व्यवस्थापन करणे शक्य नसले तरी काही प्रमाणात त्या विषयी उपाय योजना करता येते आपत्ती मग ती नैसर्गिक असो किंवा मानवी असो, त्यामुळे नुकसानच होत असते. आपत्ती विनाशकारी असून तिच्यामुळे मानवी जीवन विस्कळीत होते. आपत्तीमुळे जीवीतहानी वित्तहानी तर होतेच शिवाय पर्यावरणातही प्रदुषण वाढते. मानवी जिवनाच्या विकासामध्ये आपत्ती अचानकपणे निर्माण होणारा अडथळा असल्यामुळे त्या आपत्तीचे व्यवस्थापन जरूरीचे असते.

*** आपत्ती व्यवस्थापन म्हणजे काय ?**

''आपत्ती कोसळणे'' किंवा ''संकट येणे'' हे मानवी जीवनातील हे एक मोठा अडथळा आहे. मानवावर येणारी आपत्ती ही कोणत्याही प्रकारची असते. त्या आपत्तीचा सामना व्यवस्थीतपणे झाला तरच मानवी जीवन यशस्वी ठरते. त्यासाठी अचानक आपत्ती येऊ नये, आलेल्या आपत्तीची झळ आपणास पोहचू नये म्हणून आपत्ती व्यवस्थापनाची गरज असते.

*** व्याख्या** – (Meaning)

''सजिव सृष्टीवर अचानक आलेल्या संकट किंवा अरिष्ट मोठा अपघात (महापूर, भूकंप, ज्वालामुखी,उद्रेक, आग व वायुगळती इ.) म्हणजे आपत्ती होय.'' आपली नैसर्गिकरित्या येऊ शकते किंवा मानवाच्या कार्यवाहीने सुध्दा निर्माण होऊ शकते. सामान्यपणे आपत्ती ही पर्यावरणीय विनाशकारी घटना आहे. ही मानवनिर्मित किंवा निसर्ग निर्मितही असु शकल्याने तिच्या योग्य व्यवस्थापनाची अत्यंत गरज असते. संरक्षण आणि सामाजिक अभ्यासानुसार, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या बदलत्या संशोधनानुसार त्या-त्या आपत्तीचे योग्य व्यवस्थापन करणे जरूरीचे ठरते. आपत्ती व्यवस्थापनामध्ये जीवीतहानी रोखणे हे अपेक्षित असून त्यातून होणारे नुकसान कमी किंवा ते पूर्णपणे टाळण्याचे असते. आपत्तीपासुन निर्मित नुकसान तात्काळ भरून निघू शकत नसले तरी त्यासाठी योजनाबध्द कार्याची गरज असते. ''निसर्गानिर्मित आपत्तीवर तात्काळ नियंत्रण घालणे अशक्य असते पण मानव निर्मित आपत्ती लवकर आटोक्यात आणणे शक्य असते. व्यवस्थापनास आपत्ती विषयक सर्व प्रकारच्या माहितीची गरज असते. त्यातूनच कार्यवाहीची दिशा निश्चित असते. ''आपली विषयक परिस्थिती नियंत्रण करणे, धोकेदायक परिस्थिती दूर करणे म्हणजे 'आपत्ती' व्यवस्थापन होय.''''नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्तीत कमीत कमी जीवीत व वित्तीयहानी होईल या दृष्टीने नियोजन करणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय.'' आपत्ती व्यवस्थापनाची ही संकल्पना सध्या जवळपास सर्वश्रुत झाली आहे. यामुळे सामान्य मानसापासून ते शासनापर्यंत सर्वचजण याबद्दल गंभीरपणे विचार करीत आहे. वर्तमानपत्रातही समुद्राला भरती कधी येते याबद्दलच्या तारखा प्रसिध्द होत असतात. महानगरपालिकाही गटारी, साफ करणे, रेल्वे ट्रॅक स्वच्छ ठेवणे, तसेच आपत्ती उद्‌भवू नये यासाठी विविध उपाययोजना राबवित आहेत. अजूनही रस्त्यातील खड्डे बुजविणे, रस्त्याचे डांबरीकरण करणे, रेल्वेतील सिंग्नल यंत्रणा सक्षम आहे की नाही याची तपासणी करणे याबद्दल दक्षता घेत आहे. आपत्ती व्यवस्थापनाची जाणीव मानवापुरती मर्यादीत नसून ती पशुपक्षी प्राण्यांमध्ये ही आढळून येते. ती मानवी जीवन सृष्टीइतकीच पूरातन आहे. आदिमानवाला आपत्ती व्यवस्थापनाचे ज्ञान असल्याने ऊन, वारा, पाऊस, यापासून रक्षण करणारी सोय करणे. इ.स.३२१ वर्षापुर्वी आर्यचाणक्याने लिहलेल्या ''अर्थशास्त्र'' या ग्रंथात आपत्ती व्यवस्थापणाचे उत्तम उपाय दिलेले आहे. या ग्रंथात आग, पुर, दुष्काळ यासारख्या आपत्तीचे व्यवस्थापन कसे करावे याबद्दल माहिती दिलेली आहे.

*** मदत कार्य** :

कोणत्याही आपत्तीचे अनेक प्रकारचे परिणाम आढळून येतात. मृत्य ओढवणे, जबर जखमी होणे, संपूर्ण मालमत्ता नष्ट होणे, तिची अंशतः पडझड होणे, शेतातील पीक नष्ट होणे, जमिनीची धूप होवून तीचा कस कमी होणे, आजार, रोगराई,दगडामातीचे प्रचंड ढिगारे, चिखल, अग्नीकांड इ. विचारात घ्यावेत, तितके थोडेच आपत्ती हे देशातील सरकार व जनता यांच्या दृष्टीच्या एका प्रचंड असे आव्हान असते व ते पेलावेच लागते.साहजिकच त्या संदर्भात तात्काळ व सर्व प्रकारची कारवाई करून आपत्तीतून देशाला बाहेर काढण्याची व लोकांचे जीवन पुर्ववत बनवण्याची जबाबदारी ही सर्वाचीच असते. ''मदतकार्य'' हाही जबाबदारीचाच महत्वाचा भाग आहे. 'मदतकार्य' या शब्दप्रयोगाच्या व्याख्येनूसार जनजीवन सामान्य पातळीला आणण्यासाठी होणारी सुनियोजित अथवा तात्काळ स्वरूपात केलेली प्रत्येक कृती तात्काळ आवश्यक ती साधनसामुग्री पुरवणे, आपदग्रस्तांचे स्थलांतर व निवाऱ्याची व्यवस्था करणे त्यांचे पुनर्वसन करणे, त्यांच्यासाठी नवीन घरे बांधणे आवश्यक त्या सोयीसुविधा निर्माण करणे अशी अनेक प्रकारची कार्ये मदत कार्यात सभाविष्ट होतात. सुटकेच्या कार्याप्रमाणेच मदतकार्यातही सुसंगतता येण्यासाठी व कार्यक्षमता वाढवण्यासाठी त्याचीही पध्दतशीर योजना आखून तिची अंमलबजावणी करावी लागते.

**※मदत कार्याची प्रक्रिया :**

मदतकार्य ही एक प्रकारची प्रक्रियाच असते. आपत्तीची पूर्वसूचना मिळताक्षणीच या प्रक्रियेचा आरंभ होतो व बचाव आणि सुटकेबरोबरच मदतकार्य ही प्रत्यक्षात केले जाते. मात्र सुटकेचे (बचावाचे) कार्य काही दिवसातच पूर्ण होते. परंतु मदतीचे कार्य मात्र पुढेही अधिक काळ चालु ठेवावे लागते. हा कालावधी आपत्तीने झालेला हानीचे एकूण प्रमाण आणि जनजीवन पूर्ववत होण्यासाठी आवश्यक ती परिस्थिती निर्माण करणे या घटकांवर अवलंबून असतो. तसेच प्रत्येक आपत्तीमध्ये होणारे नुकसान हे वेगवेगळ्या प्रकारचे असल्याने मदतकार्याचे स्वरूपही वेगवेगळे राहते. उदा. दुष्काळा सारखी आपत्ती ओढवली तर त्यात मालमत्तेचे कोणतेही नुकसान होत नसते. त्यांचे त्या ठिकाणी स्थलांतर झाल्यामुळे निवाऱ्याची व्यवस्था करणे, त्यांना आर्थिक मदत, शिदा वगैरे देणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, अवर्षणामुळे, झालेल्या हानीची नुकसान भरपाई करणे यासारखे मदतकार्याचे स्वरूप राहील व सामान्यतः पुढील पावसाळा सुरु होईपर्यंत हे कार्य करावे लागेल. तर भुकंप त्सुनामी किंवा वादळासाख्या आपत्तीमध्ये बऱ्याच प्रकारची तात्काळ स्वरूपाची मदत बहुतेकवेळा मिळतच असते. कारण मदतीचा गैरफायदा घेण्याचा सर्वांनीच प्रयत्न केला. सरकारकडून घरे बांधून मिळणार हे समजल्यावर ज्यांची घरे उध्वस्त झाली अशा आपद ग्रस्ताबरोबरच ज्यांची पूर्वी घरेच नव्हती अशी अनेक लोक फुकटात घरे मिळवण्यासाठी शासन यंत्रणेजवळ आले. आपदग्रस्तासाठी संक्रमण शिबिरे उभारण्यासाठी सरकारजवळ जागाच नव्हती पुरेशी साधनसामुग्री ही नव्हती कारण अशा प्रकारची आपत्ती ही प्रथमच ओढवली होती. साहजिकच शाळांच्या इमारती बराच काळ शिबीरांसाठी वापराव्या लागल्या त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणांत मोठा खंड पडून त्यांचे नुकसान झाले. मनुष्यबळाच्या कमतरेमुळे लष्कराची मदत घ्यावी लागली. सुदैवाने लष्कराने पुरेशी जागरूकता दाखवल्याने व वैद्यकीय सहाय्यक वेळेवर मिळाल्याने आजार, साथी यांचा प्रादुर्भाव झाला नाही. आपदग्रस्तांच्या राहण्याचे ठिकाण पूर्वीची त्यांची परिस्थिती याबाबत शासकीय दप्तरात, कोणतीच माहिती नव्हती. त्यामुळे आपदग्रस्त कोण व त्यांचे झालेले नेमके नुकसान या विषयीचा अंदाज घेणे अशक्य झाले. भावी काळात आपत्ती ओढवून लोकांचे नुकसान होऊ नये म्हणून सरकारने किनारपट्टीपासून ५०० मिटर आतापर्यंत कोणत्याही बांधकामावर बंदी घालण्याचे ठरवले तर त्यात अनेक कायदेशीर अडचणी उद्‌भवल्या, पुनर्वसनासाठी इतरत्र जागा मिळवणेही, दुरापास्त झाले आणि राजकीय दबावामुळे पुनर्वसनाची बाब गुंतागुतीची झाली. त्या खेरीज वेळेवर अंमलबजावणी करता न आल्याने जनतेच्या रोषालाही तोंड द्यावे लागले. त्यावरून असा धडा मिळतो की कोणतेही संकट कधीही उद्‌भवू शकते हे ध्यानात घेवून सुटका कार्याप्रमाणेच मदत आणि पुनर्वसनाच्या कार्याचीही पुर्वतयारी करणे, नियोजन करणे व त्याची कार्यक्षमरित्या अंमलबजावणी करणे हे महत्वाचे असते.



पुरातून सुटका



मदत कार्याचे कुशल व्यवस्थापन

**※ विकास आणि पुनर्रचना –**

विध्वंसातून विजयाकडे । इतिहास असे सांगतो की, जगात पूर्वीपासून अनेक साम्राज्ये निर्माण झाली व काळाच्या ओघात नष्ट ही झाली. देशाच्या सिमारेषा वारंवार बदलत गेल्या भौगोलिक घडामोडींमुळे महासागरात अनेक बेटे लुप्त झाली तर नवीन बेटे भूपृष्ठ उचलले जाऊन निर्माण झाली, नद्यांनी आपले प्रवाह बदलले, पर्वत नाहीसे झाले, तसेच ते नव्याने अस्तित्वात आले. जुन्या संस्कृती लयाला गेल्या, नविन संस्कृतीचा उदय झाला. या अशा प्रचंड उलथापालथीच्या परिस्थितीत, भौगोलिक बदलात एक गोष्ट मात्र स्थायी स्वरूपात राहिली. ती म्हणजे मानवाची प्रचंड इच्छाशक्ती व दुर्दम्य जिद्द। त्यामुळेच भूतकाळातच जुन्या संस्कृतीच्या जागी पुर्वीच्या संस्कृतीचा वारसा आणि नवी मुल्ये यांचा समन्वय साधणाऱ्या वर्तमानातल्या नव्या संस्कृतीचा उदय झाला. विध्वंसातूनच अधिक चांगली परिस्थिती अस्तित्वात आली, व संपन्न भविष्यकाळाविषयी आशादायक चित्र निर्माण झाले. उध्वस्त देशांची पुनर्रचना झाली व अधिक वेगाने विकास झाला. अनेक देशांच्या उदा. वरून ही गोष्ट ध्यानात येते. आपत्ती हे विध्वंसाचे कारण आहे. पण त्यामुळेच जुन्या गोष्टींची साफसफाई होते.

**※ लोकजागृती – (Public Awareness)**

जाणीव-जागृती मानवी जीवनात अढळस्थान प्राप्त करून आहे. अजाण बालकाला जाणीव जागृतीचा मार्ग माता - पित्यांनी दाखवायचा असतो तर युवा प्रोढांनी तो मार्ग अध्ययनातून आत्मसात करावयाचा असतो. आपत्ती म्हणजे काय ? त्या-त्या आपत्तीचे तत्कालीन आणि दिर्घकालीन परिणाम कोणते ? त्या आपत्तीचे झळ पोहचु नये यासाठी काय करावे ? आपत्ती विषयी कोणती जाणीव जागृती असावी ? या सर्वाच्या ज्ञानाची, माहितीची गरज मानवीजीवन जोपासण्यासाठी असते. अमुल्य जीवनाच्या योग्य संगोपनासाठी जाणीव -जागृती अत्यंत आवश्यक आहे. मानवी जीवनमुल्ये, राष्ट्रशक्तीमधील वृध्दी आणि प्रशिक्षण या संदर्भात लोकजागृती अत्यावश्यक बनलेली आहे. भुतलावरील सजीव सृष्टीच्या संरक्षणासाठी लोक जागृती होणे काळाजी गरज आहे. पर्यावरणातील वाढते असंतुलन सजीवांच्या नष्ट होणाऱ्या जाती-प्रजाती थांबविण्यासाठी आणि मानवीजीवनाची आवश्यकता या सर्वासाठी लोकजागृती अत्यावश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ

१) कर्नल (निवृत्त) प्र.पु. मराठे, प्रा.व्ही.जे.गोडबोले आपत्ती व्यवस्थापन- संकल्पना आणि कृती २) कर्नल पी.पी. मराठे अनुवाद : जॉन्सस बोर्जेस कृतिबध्द आपत्ती व्यवस्थापन ३) प्रा.ए.पी. चौधरी प्रा.अर्चना चौधरी (आपत्ती व्यवस्थापन) ४) योजना - जुलै २००९